UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

Scanned by CamScanner

CURRENT GLOBAL REVIEWER

Half Yearly
Issue IX Vol III , May. To Oct. 2017

UGC Approved
Sr. No. 64310

ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Research
Refereed Multidiciplanary Journal

Editor In Chief
Mr. Arun B. Godam

Special Editor
Prof. Jadhav Baburao B.
Dept. of Political Sci.
Bapusaheb Khandekar Mahavidalaya , Udgir

ISSUE IX Volume III ( Half Yearly) May. To Oct . 2017

Editorial Office Address :
Khadgaon Road, Kapil Nagar,
Latur, Dist. Latur 413512
(M.S.) India

Contact: 8149668999
Email:
[illegible]

EXECUTIVE EDITORS

Dr. Chitta Ranjan Panda
P.G. Dept. Of Odia
Shailabala Women's
Autonomous College
Cuttack – (Orissa)

Dr. U.T. Gaikwad
Dept. of Geography,
Smt. S. D. M. College
Latur, Dist. Latur (M.S.)

Maimanat Jahan Ara
Head, Dept of Political Science,
Sir Sayyed College,
Aurangabad, Dist. Aurangabad

Dr M.U. Yusuf
Dept of Commerce,
Sir Sayyed College,
Aurangabad, Dist. Aurangabad

Dr. Hanumant Mane
R.Guide & Head,
Dept. of Marathi,
Shivchatrapati College,
Kalam, Dist. Osmanabad(M.S.)

R.J. Hirve
Dept. of Botany
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

Dr. Pralu Dddeshwar Mane
Dept. of Zoology,
Maharashtra Udaygiri
Mahavidyalaya, Udgir,
Dist. Latur

Dr U.V.Panchal
H.O.D. Dept of Commerce,
Deogiri College,
Aurangabad, Dist. Aurangabad

Pro. S.B. Karande
Dept. of Economics,
Shri Bhausaheb Vartak College,
Borivali (W), Dist. Mumbai

Dr. N.J. Waghmare
Research Guide & Head,
Dept. of Pali,
Govt. Sanskrita College,
Shivani, (M.P.)

Publisher
Shaury Publication
Kapil Nagar, Latur
Contact- 8149668999

Price:- Rs. 300



Scanned by CamScanner

CURRENT GLOBAL REVIEWER

H

Is l III , May. To Oct. 2017 | UGC Approved Sr. No. 64310 | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 2.143

# मानवी हक्क : महिला

प्रा.आर.बी.काळे
समाजशास्त्र विभाग,
र.भ.अट्टल महाविद्यालय,गेवराई



**प्रस्तावना :**

सभ्य, सुसंस्कृत समुह जीवनासाठी मानवी अधिकार महत्वाचे आहेत. व्यक्तीला त्याचा आत्मसन्मान,प्रतिष्ठा प्राप्ती साठी अपरिहार्य असुन व्यक्तीच्या आयुष्यातील हक्क वजा केल्यास माणूसपण शिल्लक राहत नाही. मानवी हक्क ही संकल्पना नैसर्गिक हक्क संकल्पनेमध्ये समाविष्ठ आहे. तसेच मनुष्य जन्मतः काही हक्क घेऊन जन्माला येतो. नैसर्गिक व सामाजिक न्यायासाठी मानवी हक्क महत्वपुर्ण भुमिका निभावतात. मानवी कुटुंबातील सर्व व्यक्तींची प्रतिष्ठा व अधिकार यांना मान्यता देणे मग ती स्त्रि असो अथवा पुरुष दोघांनाही मानवी अधिकारापासून वंचीत ठेवू शकत नाहीत. कारण मानवी हक्क आयोगाने स्त्री-पुरुष दोन्ही समान संबोधले आहेत.

प्रत्येक काळात श्रेष्ठ किंवा वरिष्ठाने कनिष्ठाचे शोषण केल्याचे दिसून येते. मग ते जात,लिंग,वंश,धर्म आणि आधार कोणताही असो शोषक अन् शोषित असे दोन वर्ग समाजात अस्तित्वात असल्याचे दिसून येते. या शोषीतांमध्ये ज्यू,निग्रो,गुलाम,कृषक आणि स्त्रियां इत्यादींचा समावेश होतो. या शोषीत लोकांना मुक्तपणे जगता यावे, हक्काचे रक्षण करावे म्हणून जागतिक पातळीवर १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्क आयोगाची स्थापना केली. प्रत्येक देशात आपल्या जनतेच्या हिताचे रक्षण करावे असे निश्चित करण्यात आले. मानवी हक्क आयोगाच्या घोषणापत्रात असे नमूद करण्यात आले की, जन्मतः सर्व माणसे स्वतंत्र आहेत तसेच त्यांची प्रतिष्ठा आणि अधिकार समान आहेत.

**मानवी अधिकार आणि महिला :**

दुसऱ्या महायुध्दाच्या व्यापक नरसंहार, अत्याचाराचे परिणामी मानव अधिकाराचे वैश्विक घोषणापत्र जाहिर केले. त्याचा आरंभ सर्व माणसे जन्मतः समान आहेत आणि त्यांना जन्मतः अविशिष्ट अधिकार व मुलभूत स्वातंत्र्यप्राप्त झालेली आहेत या विधानाने होतो. मानवाची भितीपासून मुक्तता करणे, त्याच्या मुलभूत अधिकार व स्वातंत्र्याचे रक्षण करणे व व्यक्तीचा सर्वांगिण विकास या सर्व घटकांचा मानवी हक्कामध्ये समावेश होता. प्राचीन काळापासून समाजात पुरुषांचेच वर्चस्व अधिक असल्याचे दिसून येते. तोच कायदा निर्माण करणारा, शासन- प्रशासन चालवणारा समाजातील महत्वपुर्ण घटक होता. महिलांना समाजात, कुटुंबात दुय्यम दर्जा दिला जात होता. पण विकासरुपी रथाची महिला व पुरुष ही दोन चाके समान आहेत याकडे दुर्लक्ष होत होते. २१ व्या शतकापर्यंत महिलांच्या सामाजिक, आर्थिक स्थिती व अधिकार या दर्जात काहीच सुधारणा झाली नाही. १९९३ मध्ये व्हिएन्ना येथे आयोजित युनोच्या विश्व संमेलनात महिला अधिकारावर व्यापक चर्चा घडून आली. त्यात आंतरराष्ट्रीय समुदायाने महिला व बालिका (मुलींचे) मानवअधिकार मुलभूत अधिकारांचा अहस्तांतरणीय अतुट व अविभाज्य हिस्सा आहे असे नमुद केले. परिणामी मानवी अधिकारांमुळे होणारे अमानविय शोषण, व्यवहार,संघर्ष याविरुध्द न्याय मिळण्यास मदत झाली. मानवी अधिकार संघटन व संस्था, प्रशासन व शासनावर दबाव टाकून मानव अधिकाराचे उल्लंघन, होणारे शोषण नियंत्रणात आणतात.

**भारतीय संविधान आणि महिला मानव अधिकार :**

भारतीय संविधानाच्या कलम १२-३५ मध्ये नागरिकांचे मुलभूत अधिकार स्पष्ट केले आहेत. त्या अधिकारांचा अवलंब करुन नागरिकांना आपले जीवन चांगल्याप्रकारे जगण्यासाठी मदत होते. तसेच भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेत महिला व पुरुष यांच्यात सामाजिक, आर्थिक, राजकिय न्याय, स्वातंत्र्य व समानतेत काही भेदभाव केला नाही. नागरिकांना समान संधी व हक्क दिल्याने तरी परंतु भारतात मानवी अधिकाराची आवश्यकता भासली. कारण घरगुती हिंसाचार,स्त्रीभ्रूण हत्या, अन्याय व अत्याचार या पासून संरक्षण, कार्यालयात कार्य करणाऱ्या महिलांचे होणारे शोषण, दुय्यम दर्जाची वागणूक, अधिकारावर अतिक्रमण इत्यादी.

**महिलांचे मानवी अधिकार :**

Scanned by CamScanner

१. महिलांना सर्व क्षेत्रात पुरुषांबरोबर समान अधिकार प्रदान केले आहेत. जर कोणी यास विरोध,त्यावर अन्याय व मर्यादा आणत असेल तर तो अपराध मानला जाईल.

२. महिलांना हीन, दुय्यम मानणारे विचार,प्रथा,परंपरा समाप्त करुन जनजागृती घडवून आणली जाईल. तसेच राष्ट्रीय स्तरावर या दृष्टीने योग्य उपाययोजना करण्यात येतील.

३. महिलांना पुरुषांप्रमाणेच राष्ट्रीयत्व प्राप्त करणे व ते बदलणे (नागरिकत्व प्राप्त करण्याचा) अधिकार आहे.

४. महिला- पुरुष समानतेच्या हक्कासाठी महिलांना कायद्याने संरक्षण मिळेल.

५. पती- पत्नीच्या समान सिध्दांताला सुनिश्चितीसाठी सर्व उपाय करण्यात येतील. विशेषत: महिलांना जीवनसाथी निवडणे, विवाह संमती, विवाहानंतर पुरुषांसारखेच अधिकार व कर्तव्य समान असतील.

भारतात महिलांच्या मानवी अधिकारांना सन्मान देण्याची संस्कृती अजूनही विकसित झालेली नाही. यामुळेच विभीन्न स्तरावर मानवी अधिकारांचे उल्लंघन होतांना दिसून येते. यासाठी भारतात अनेक कायदे व नियम बनविले आहेत. तसेच न्याय व्यवस्थेने आदेश जारी केले आहेत. जसे कौटुंबिक महिला हिंसाचार,अत्याचारांवर नियंत्रण मिळविण्यासाठी घरगुती हिंसा प्रतिबंधात्मक अधिनियम, स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी कायदा, हिंदू विवाह कायदा-१९५५ च्या कलम २२ नुसार घटस्फोटाचा अधिकार, पोटगी प्राप्त करण्याचा अधिकार, महिलांना राजकीय अधिकार देण्यासाठी स्थानिक शासनात ५० % पद राखीव जागा, चांगले आरोग्य समाज विकासाचा एक हिस्सा बनवणे हा उद्देश समोर ठेवून महिला आरोग्य विषयक कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली आहे. विशेषत: ग्रामीण महिलांना चांगले आरोग्य सुविधांना प्राधान्य दिले. कुटुंब न्यायालय स्थापन करण्यात आली. महिला व बाल संरक्षण अधिकारी नियुक्त करण्यात आले. त्यांच्या माध्यमातून महिला अधिकारांचे संरक्षण करण्यात येते, राष्ट्रीय महिला आयोग, महिला धोरण, विशाखा समिती यांच्या माध्यमातून महिला अधिकार जागृती व संरक्षणाच्या दृष्टीने कार्य केले जाते.

**सारांश :**

जागतिक स्तरावर महिलांची परिस्थीती लक्षात घेऊन महिलांच्या संदर्भातील मानवी हक्कांना विविध कायद्याच्या व न्यायालयीन निर्णयाच्या माध्यमातून संरक्षण देण्यात आले आहे. परंतु जो पर्यंत कायदे व न्यायालयीन निर्णयांची प्रभावीपणे व प्रामाणिकपणे अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत महिलांचा सन्मान व मानवी हक्कांचे संरक्षण होऊ शकणार नाही. म्हणून व्यापक स्वरुपात व व्यापक स्तरावर महिलांचे हक्क व अधिकारांसदर्भात जनजागृती होणे आवश्यक आहे. व त्यामाध्यमातून विकास प्रक्रियेत सहभागी करुन घेणे तितकेच महत्वाचे आहे.

------------**संदर्भ** : --------------------


१.महारोत्रा, ममता, महिला अधिकार व मानव अधिकार, प्रभात प्रकाशन, कानपूर २०११

२.श्रीवास्तव, सुधा राणी/ रागीणी, मानव अधिकार और महिला उत्पीडन, कॉमनवेल्थ पब्लिकेशन नवी दिल्ली,२००१

३.सिंह, वी.एन./ जनमेजय,आधुनिकता एवं नारी सशक्तीकरण, रावत पब्लिकेशन,२०१०

४. कुमार नागोराव, मानवी हक्क, स्नेहाऑफसेट, लातूर २०१०



Scanned by CamScanner